Letter Head 2014-15 NSS


# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

Aurangabad - 431 004. Maharashtra (India)

NAAC 'A' Grade

## NATIONAL SERVICE SCHEME

Not Me But You

Dr. Rajesh Karpe (M.A. SET. Ph. D.)
Programme Co-ordinator
Mobile : 8275092478


Ref. No. NSS/2016/1876-2101 Date :

७/६/२०१६

प्रति,
**मा. प्राचार्य/ कार्यक्रमाधिकारी,**
**राष्ट्रीय सेवा योजना सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**

विषयः- दिनांक- १/१/२०१६ रोजी वयाची १८ वर्षे पुर्ण केलेल्या लोकांना मतदार ओळखपत्र (EPIC) वाटप करण्याचा सोहळा आयोजित करण्याबाबत.

संदर्भ क्र. रानिआ/नप -२०१६/प्र.क्र.१२/का-६ , राज्य निवडणूक आयोग,मुंबई दि. १० मे २०१६.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्य निवडणूक आयोग यांच्या पत्रानुसार आपणास माहित आहे की, राज्यातील सुमारे १९५ नगरपरिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा, १९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका मार्च- २०१७ पुर्वी होणार आहेत.

या निवडणुकांमध्ये दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींची नावे मतदार यादी मध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे.

आपण महाविद्यालयामध्ये दिनांक २५ जुलै, २०१६ व १६ ऑगस्ट, २०१६ या दोन दिवशी मतदार ओळखपत्र (EPIC) वाटप करण्याचा सोहळा आपल्या महाविद्यालयामध्ये राबवावा.

हा कार्यक्रम जिल्हयातील/ तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात यावा. या कार्यक्रमासाठी स्थानिक महत्वाच्या व्यक्ती, पत्रकार, प्राचार्य, विद्यार्थी यांना आमंत्रित करण्यात यावे. या कार्यक्रमामध्ये कमीत कमी १०० मुला- मुलींना (वयाची १८ वेर्षे पण करणा-या) मतदार ओळखपत्राचे (EPIC) वाटप करावे. कार्यक्रमास मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी. यावर होणारा खर्च महाविद्यालयांचे संबंधित संस्थांनी त्यांच्याकडील निधीतून भागवावयाचा आहे. तसेच सदर कार्यक्रमाचा अहवाल कार्यक्रमाच्या २-२ फोटोंसह राष्ट्रीय सेवा योजना विभागात कार्यक्रम झाल्यापासून एक आठवडयात सादर करावा.

कार्यक्रम समन्वयक

**सोबत: राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे पत्र**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY
In. No. 1121
(Gen. Admin.)
Date 26/5/16
AURANGABAD

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. १२/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० मे, २०१६.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना
औरंगाबाद

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
महानगरपालिका आयुक्त,
(बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर,
नाशिक,अकोला, अमरावती, नागपूर)

विषय:- दिनांक- ०१/०१/२०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या लोकांना मतदार ओळखपत्र (EPIC) वाटप करण्याचा सोहळा आयोजित करण्याबाबत...

महोदय,

आपणास माहितच आहे की, राज्यातील सुमारे १९५ नगरपरिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीत होणार आहेत.

२. या निवडणुकांमध्ये दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र व्यक्तींची नावे मतदार यादीमध्ये नोंदणी होणे आवश्यक आहे. जरी याबाबतची कार्यवाही भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे सतत चालू असली तरी, त्यामध्ये आवश्यक ती गती नसल्यामुळे राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मा. राज्यपाल महोदयांशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मला आपणास असे आदेश देण्याच्या सूचना आहेत की, आपण ***दिनांक २५ जुलै, २०१६ व १६ ऑगस्ट, २०१६*** या दोन दिवशी मतदार ओळखपत्र (EPIC) वाटप करण्याचा सोहळा प्रत्येक जिल्हयामध्ये आणि प्रत्येक तालुक्यामध्ये राबवावा.

DSW

२. हा कार्यक्रम जिल्हयातील/तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात यावा. या कार्यक्रमासाठी स्थानिक महत्वाच्या व्यक्ती, पत्रकार, विद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी यांना आमंत्रित करण्यात यावे. या कार्यक्रमामध्ये कमीत कमी १०० मुला-मुलींना (वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या) मतदार ओळखपत्राचे (EPIC) वाटप करावे. कार्यक्रमास मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी. यावर होणारा खर्च संबंधित संस्थांनी त्यांच्याकडील निधीतून भागवावयाचा आहे. तसेच सदर कार्यक्रमाचा अहवाल कार्यक्रमाच्या प्रत्येकी २-२ फोटोंसह राज्य निवडणूक आयोगास कार्यक्रम झाल्यापासून एक आठवडयात सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) कुलगुरु, (मुंबई विद्यापीठ,एम.जी.रोड,फोर्ट,मुंबई. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई.सावीत्रीबाई फुले विद्यापीठ,जि.पुणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.जि.औरंगाबाद.स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ,जि. नांदेड. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर.संत गाडगेबाबा विद्यापीठ, जि. अमरावती. शिवाजी विद्यापीठ,जि. कोल्हापूर. सोलरपूर विद्यापीठ,सोलापूर.उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ,जि.जळगाव. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली,जि. रत्नागीरी.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,कृषी नगर,जि. अकोला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी,जि. अहमदनगर. मराठवाडा कृषी विद्यापीठ,जि.परभणी. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक.) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

२) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

३) विभागीय आयुक्त (सर्व ) यांना माहितीकरिता आणि जिल्हयातील महसूल यंत्रणा, महानगरपालिका आणि विद्यापीठ प्रतिनिधी, महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्याशी समन्वय साधण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करण्याकरिता अग्रेषित.

४) महानगरपालिका आयुक्त (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

५) तहसिलदार, (सर्व तालुके)

६) मुख्याधिकारी (संबंधित नगर परिषदा/नगर पंचायती)

७) अवर सचिव (कार्या-५ व ७)

८) निवड नस्ती